Estd 1962
NAAC 'A' Grade

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

विद्यापीठातील अधिकारी व प्रशासकीय सेवकांना विद्यापीठाच्या किंवा इतर संस्थांच्या विविध अभ्यासक्रमांना **बहि:स्थ/नियमित विद्यार्थी** म्हणून प्रवेश घेण्यास/परीक्षा देण्यास महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९८१ नुसार परवानगी दिली जाते. तरी सर्व अधिकारी व प्रशासकीय सेवकांना आदेशानुसार कळविण्यात येते की, **सन २०१९–२०२०** मध्ये या विद्यापीठाच्या तसेच अन्य संस्थांच्या व नेट, सेट वा तत्सम परीक्षांना बसू इच्छिणाऱ्या सेवकांचे परवानगीसाठीचे सोबतच्या नमुन्यानुसार अर्ज विभाग प्रमुखांच्या स्पष्ट शिफारशीसह आस्थापना विभागाकडे **दि. ०६/०७/२०१९** पर्यत पाठवावेत. याप्रमाणे पुर्वपरवानगी घेणे प्रत्येक कर्मचाऱ्याकरीता बंधनकारक आहे व मुदतीनंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घेण्यात यावी.

गतवर्षी ज्या सेवकांना परीक्षेस बसण्यास परवानगी देण्यात आली होती त्यांनी त्यांचा निकाल कार्यालयास कळवावा. पुढील वर्षासाठी परवानगी मागताना पूर्वीच्या निकालाची प्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

आदेशान्वये,

कुलसचिव

जा. क्र. – आस्थापना/ 3207
दिनांक – 1 JUL 2019

प्रति,

१. सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक
२. सर्व उपकुलसचिव, कायदा अधिकारी, जनसंपर्क अधिकारी, सहाय्यक कुलसचिव व समकक्ष अधिकारी.
३. सर्व प्रशासकीय विभागप्रमुख
४. मा.कुलगुरु, मा. प्र–कुलगुरु, मा. कुलसचिव, मा. संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ व मा. वित्त व लेखा अधिकारी यांचे कार्यालयास.
५. इंटरनेट विभाग– सदरचे परिपत्रक संकेतस्थळावर प्रसिध्द करावे. (Intranet)

**टीप– सदरचे परिपत्रक आपल्या विभागातील सर्व अधिकारी, प्रशासकीय सेवक, यांच्या निदर्शनास आणावे**